॥ श्री ॥

॥ बाबा ॥

नाचत गाऊ मंगलगान आमुचे बाबा हेच भगवान
बाबा लहान नी भक्त लहान
लहान झाल्याविना नाही परमस्थान ॥धृ. ॥

ब्रम्ह आत्मनात ब्रम्ह महान
त्यात ही आमुचे बाबा महान
असे आमुचे बाबा परमनिधान
असे आमुचे बाबा परमनिधान ॥ 1 ॥

त्रिभुवन व्यापक चराचर
असे आमुचे बाबा परमउदधारक
निर्गुण ब्रम्ह सनातन अव्यय अविनाशी
साकारला वांगणीत दशानिळ ॥ 2 ॥

करावे काया वाचा मनाचे समर्पण
आचार विचार उच्चार एक करील जगदीश
तरीच भेटेल जगदात्मा जगदगुरु आणि जगदीश ॥ 3 ॥

बाबा आम्हा तुम्हीच साध्य
तुम्हीच साधन आणि साधक
बाबाकृपेचा आहे शॉर्टकट
तुम्हीच आमचे खरे मायबाप ॥ 4 ॥

आत्मा आणि गुरु भेटता एकजीव
अवतरतो तुमच्यात तो वैश्वानर
करवुनी तुमची देहशुद्धी
करवी मिलाप शिवशक्ती ॥ 5 ॥

बाबातत्त्व तुम्ही मान्य करा
नाचुन घ्या तुम्ही बाबा नाम
नाम, ॐकार, ध्यान, सहजयोग
यानेच लावा तुम्ही अनुसंधान ॥ 6 ॥

बाबांना एकदा शरण जाता
बाबा करतात सर्व यथा
नित्य नेम करा श्रद्धेने
वाट पाही श्रीपती आतुरतेने
हसत जाऊ चला गोकुळात
चला जाऊ चला जाऊ वांगणीला ॥ 7 ॥

बाबा लाभले आपणा परब्रम्ह
त्यांना आळवा तुम्ही शरणाने
बाबा बाबा तुझे आहेत तात
तू आहेस त्यांचा अमृतपुत्र
सोडून दे रे नसती भीती
रहा बाबानंदाच्या ऐटीत ॥ 8 ॥

बाबा तुम्हाविण मज नको काही
अढळ शरणांगत ठेवा चरणाशी
दुर नका करु जरी मी असे तुमच्या ठोंब्या
बाबा ही दुही संपवा
करा मज तुम्हासवे एकरुप
हीच आहे याची परमआस ॥ 9 ॥

★★★★★